# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./2568/२०१८ दि.26/06/२०१८

# परिपत्रक

विषय : **" महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीबाबत "** तसेच **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये लादण्यात आलेल्या शास्तीची रक्कम जमा करण्यासाठी लेखाशिर्ष निश्चित करण्याबाबत.**

संदर्भ : १) मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासनपत्र समक्रमांकीत दिनांक ०४/०१/२०१८, दिनांक ११/०१/२०१८, दिनांक २०/०४/२०१८ व दिनांक २४/०४/२०१८ रोजीची पत्रे.

२) मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५२-२०१८/आस्था-२, दि. १६ मे २०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, दि. २८ एप्रिल २०१५ रोजी लागु करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागु झाल्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २००५ अन्वये कलम १० मध्ये पदनिर्देशित अधिकारी/अपील अधिकारी यांनी पुरेश्या व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यामध्ये कसुर केली असल्यास अशा अधिकाऱ्यांवर शास्ती लादण्याची तरतुद असुन संबधीत अधिकाऱ्यांवर शास्ती लादण्याबाबतचे आदेश पारित केल्यानंतर संबंधितांकडुन रक्कम जमा करण्याकरीता संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ जुन २०१८ रोजी बैठक आयोजीत होती. राज्य सेवा हक्क आयोगाने शासनकडे केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने आपल्यास्तरावर तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती शासनास सादर करण्यात यावी.

**(डॉ. गो. दा. दुबे)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - उपरोक्त संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. विभागप्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) अधिक्षक, बि. सी. सेल, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

3666 24/7/18
6191 28/7/18

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 674 दि. 28/7/18
जावक क्र. 1848 दि. 28/7/18

क्र : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०३/२०१८/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १४ जून, २०१८

प्रति,

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण), उपसचिव (तंत्र शिक्षण),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट राज्य, मुंबई.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 3298 दि. 26.7.18
जावक क्र.............. दि..............

विषय : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.

संदर्भ : १) शासनपत्र समक्रमांकीत दि. ४/१/२०१८, ११/१/२०१८, २०/४/२०१८ व दि.२४/४/२०१८ रोजीची पत्रे.

उपरोक्त विषयासंदर्भात संदर्भाधिन पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती अद्यापही अप्राप्त आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.८ जून, २०१८ रोजी झालेल्या बैठकीकरीता माहितीसह उपस्थित राहण्यासाठी दि.७/६/२०१८ रोजी ई-मेलव्दारे कळविण्यात आले होते. तथापि, याबाबतची आपली माहिती प्राप्त झाली नाही. राज्य सेवा हक्क आयोगाने शासनाकडे केलेल्या शिफारशीपैकी महत्वाच्या शिफारशीची प्रत सोबत जोडली आहे.

यास्तव, राज्य सेवा हक्क आयोगाने शासनाकडे केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या का र्यवाहीची माहिती तात्काळ आस्था-२ कार्यासनाकडे पाठविण्यात यावी.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

आपला,

द.रा.कहार
(द.रा.केहार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

Registrar

आस्थापना
डॉ बाबडे
28/7/18

C:\Users\shirish.padolya\Documents\क्र.CR_०३_२०१८.docx

RECEIVED 11/05/2018 16:54

दिनांक :- १० मे २०१८

## राज्य सेवा हक्क आयोगाने शासनाकडे केलेल्या शिफारशींपैकी महत्वाच्या शिफारशी

१. सर्व विभागांनी ते जनतेस देत असलेल्या सर्व सेवांची यादी ( MASTER List ) तयार करून प्रसिध्द करावी.

२. सर्व अधिसूचित सेवा ऑनलाईन होणे आवश्यक आहे.

३. ज्या विभागांच्या सेवांना अल्प प्रतिसाद आहे त्या सेवांचा आढावा घेण्यात यावा.

४. कालानुरूप अधिसूचित सेवेमध्ये वाढ किंवा घट करणे (उदा. विक्रीकर, करमणूक कर).

५. ऑनलाईन असलेल्या तथापि आपले सरकार पोर्टलशी इंटीग्रेट न झालेल्या सेवा इंटीग्रेट करून घ्याव्यात.

६. ग्राम विकास विभागाने दि.२४ जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे महसूल व नगर विकास विभागाने शासन निर्णय निर्गमित करून त्यांच्या अधिनस्त आपले सरकार केंद्रांवर सर्व अधिसूचित सेवा नागरीकांना उपलब्ध करून देणे.

७. सर्व विभागांनी तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयांनी त्यांना या कायदयान्वये प्राप्त झालेल्या ऑफलाईन अर्जांची माहिती त्यांच्या निपटाऱ्यासह विहीत नमुना प्रपत्र "अ,ब,क" मध्ये भरून ,सामान्य प्रशासन विभागामार्फत आयोगास सादर करावी.

८. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रचारासाठी सर्व विभागांनी प्रभावी प्रचार मोहिम राबविणे.

९. प्रत्येक विभागाने सेवा हक्क अधिनियमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करणाऱ्या पदनिर्देशित अधिकारी,प्रथम अपिलीय अधिकारी, व्दितीय अपिलीय अधिकारी यांच्याकरीता प्रोत्साहनपर योजना तयार करावी.

१०. राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयाकरीता वाटप करण्यात आलेल्या जागेच्या नूतनीकरणास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

(स्वाधीन क्षत्रिय)
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त
10/5/18

१. राज्यस्तरीय समिती:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४. | सह सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य सचिव |

समितीची कार्यकक्षा:-

१. टास्क फोर्सला (Task Force) आवश्यक तेव्हा मार्गदर्शन करणे

२. कार्यबल गटाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे कृति-आराखडा (Action Plan) तयार करुन शासनामार्फत मा.कुलपती यांचेकडे सादर करणे. कृती आराखडयाद्वारे खालील बाबी निश्चित करण्यात येतील.

अ) ज्या संस्थानी नियमांचे उल्लंघन केले आहे अशा संस्थाविरुध्द करावयाची कार्यवाही / उपाययोजना सूचविणे.

ब) प्रचलीत यंत्रणा वा कार्यपध्दतीमध्ये करावयाच्या सुधारणा आणि उपाययोजना सूचविणे.

क) महाविद्यालये/संस्था यांच्याकडून संबंधीत नियमांच्या उल्लंघनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विद्यापीठास मार्गदर्शक सूचना देणे.

२. कार्यबल गट (Task Force)-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. विकासचंद्र रस्तोगी, प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | डॉ.आर.एस.माळी, माजी कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | सदस्य |
| ३. | डॉ.गोविंद पारटकर, माजी प्राचार्य, वझे केळकर महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ४. | श्री. व्यंकटरमणी, सेवानिवृत्त कुलसचिव, मुंबई विद्यापीठ | सदस्य |
| ५. | श्री. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य सचिव |

कार्यबल गटाची कार्यकक्षा :-

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६ व ११७ मध्ये संलग्निकरण व नुतनीकरणाच्या तरतुदी विहित केल्या आहेत. त्यानुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, तुकडया इत्यादींचे शैक्षणिक व तद्नुषंगिक विषयाच्या अनुषंगाने तपासणी करणे.

१. कार्यबल गट विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/ परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींची खालील मुद्यांवर तपासणी करुन प्राप्त निष्कर्षाच्या आधारे सविस्तर अहवाल राज्यस्तरीय समितीला सादर करील.

अ) युजीसी / एआयसीटीई /बार कौन्सिल ऑफ इंडिया /कौन्सिल ऑफ आर्कीटेक्चर/ एनसीटीई इत्यादि सक्षम प्राधिकरणानी विहीत केलेल्या निकषानुसार संलग्नित महाविद्यालये व परिसंस्थांमध्ये भौतिक सोयी व सुविधा उपलब्ध आहेत का याबाबतची तपासणी करणे.

आ) सक्षम प्राधिकरणानी विहित केलेल्या निकषानुसार, संलग्नित महाविद्यालयामध्ये अर्हताधारक शिक्षकांची अभ्यासक्रमनिहाय उपलब्धता आहे किंवा कसे याची तपासणी आहे का याबाबतची तपासणी करणे.

इ) महाविद्यालये /परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखातुकडया इत्यादिंचे संलग्नीकरण व त्याचे नुतनीकरण विहित तरतुदीनुसार करण्यात येत आहे तसेच त्यानुसार आवश्यक त्या फीचा भरणा / वसूली विद्यापिठाकडे जमा होत आहे किंवा कसे.

ई) महाविद्यालये /परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादिंचे संलग्नीकरण व त्याचे नुतनीकरणासाठीच्या कार्यपध्दतीचे विश्लेषण करून आदर्श कार्यप्रणालीची (Standard Operating Procedure) शिफारस करणे.

२. शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये इत्यादिंनी NAAC/NBA मूल्यांकनाद्वारे मान्यता (Accredition) प्राप्त केली आहे किंवा कसे याची तपासणी करणे.

३. जिल्हास्तरीय निरिक्षण समिती :-

| अ. क्र. | अधिका-याचे पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ३ | वित्त व लेखा अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | उप विभागीय अधिकारी (महसूल) | सदस्य |
| ५ | १. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा: सह संचालक, उ.शि. मुंबई.<br>२. ठाणे व पालघर जिल्हा : सह संचालक, तंत्र शिक्षण<br>३. रायगड,रत्नागिरी व सिंधुदूर्ग: सह संचालक, उच्च शिक्षण, पनवेल | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय निरिक्षण समितीची कार्यकक्षा** :- कार्यबल गटाच्या (Task Force) निर्देशानुसार कार्यवाही करणे.

सर्वसाधारण सुचना :-

१. राज्यस्तरीय मुख्य समिती आवश्यकतेनुसार कार्यबल गटाला (Task Force) कामकाजाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना देऊ शकेल.

२. राज्यस्तरीय मुख्य समितीने आपला अहवाल व उपाय योजनात्मक कृतीआराखडा तीन महिन्यात शासनामार्फत मा.कुलपती यांचेकडे सादर करावा.

३. कार्यबल गटाने (Task Force) जिल्हा निरिक्षण समितीमार्फत करावयाची कार्यवाही बाबतचे नियोजन व वेळापत्रक आपल्या सोयीनुसार तयार करावे.

४. कार्यबल गट (Task Force) आवश्यकतेनुसार तक्त्यांचे नमुने विहित करून जिल्हा समितीमार्फत महाविद्यालयांकडून माहिती संकलित करू शकेल.

५. उपरोक्त नमूद तीनही समित्यांची प्रथम बैठक मा. अ.मु.स.,उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे घेण्यात येईल व सदर बैठकीत पुढील कामकाजाची दिशा ठरविण्यात येईल.

६. कार्यबल गटाच्या (Task Force) बैठका मुंबई विद्यापीठात घेण्यात येतील. त्यानुषंगाने कामकाज करण्यासाठी कार्यबल गटाला लागणारे आवश्यक ते संपूर्ण सहकार्य मुंबई विद्यापीठाने उपलब्ध करून द्यावे.

७. मुंबई विद्यापीठाने कार्यबल गटाच्या कामासाठी (Task Force) एक उपकुल सचिव/सहाय्यक कुलसचिव या दर्जाच्या अधिका-याची समन्वयक अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

८. समितीतील अशासकीय सदस्यांचे प्रवास व इतर भत्ते नियमानुसार मुंबई विद्यापीठाने विहित केलेल्या नियमानुसार अदा करणे बंधनकारक राहील.

९. उपरोक्त प्रमाणे सूचना महाराष्ट्र अधिनियम, २०१६ मधील कलम ८(६) अंतर्गत राज्यशासनाला असलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०५१२०५०१९००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. कुलगुरु/कुल सचिव, मुंबई विद्यापीठ,
२. श्री. विकासचंद्र रस्तोगी, प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,मुंबई.
३. डॉ.आर.एस.माळी, माजी कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
४. डॉ.गोविंद पारटकर, माजी प्राचार्य, वझे केळकर महाविद्यालय, मुंबई.
५. श्री. व्यंकटरमणी, सेवानिवृत्त कुलसचिव, मुंबई विद्यापीठ
६. श्री. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
७. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

८.मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९.मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
१०.सह सचिव यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
११.मुंबई विद्यापीठ, मुंबई.
१२.निवडनस्ती (विशि-३).

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५२-२०१८/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४३१, (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दि. १६ मे, २०१८

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 672 दि. 23/7/18
जावक क्र. 1841 दि. 23/7/18

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 3297 दि. 26.7.18
जावक क्र. ........ दि. ........

प्रति,

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण), उपसचिव (तंत्र शिक्षण),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अन्वये लादण्यात आलेल्या शास्तीची रक्कम जमा करण्यासाठी लेखाशीर्ष निश्चित करण्याबाबत...

उपरोक्त विषयासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३/०४/२०१८ च्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय आपल्या कार्यालयातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावा.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(शा. भा. पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Registrar
immediate

९६/५

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत शास्तीची रक्कम जमा करण्यासाठी नविन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१७/प्र.क्र.२१८/१८ (र. व का.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २३ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

शासन निर्णय:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या अधिसूचनेअन्वये कार्यान्वित झाला आहे. सदरहू अधिनियमातील कलम १० मध्ये पदनिर्देशित अधिकारी/ अपील प्राधिकारी यांनी पुरेश्या व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यामध्ये कसूर केली असल्यास अशा अधिकाऱ्यांवर शास्ती लादण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन पदनिर्देशित अधिकारी / अपील अधिकारी यांच्यावर शास्ती लादण्याबाबतचे आदेश पारित केल्यानंतर संबंधितांकडून रक्कम जमा करण्याकरीता खालील प्रमाणे लेखाशीर्ष उघडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | English | मराठी |
|---|---|---|
| **Major Head**<br>मुख्य लेखाशीर्ष | **0070, Other Administrative services** | ००७०, इतर प्रशासनिक सेवा, |
| **Sub Major Head**<br>उप मुख्य लेखाशीर्ष | **60- Other services** | ६० - इतर सेवा |
| **Minor Head**<br>गौण शीर्ष: | **119 - Penalties for Deficiency in Public Services** | ११९- लोकसेवा कसूरीबाबत दंड. |
| **Group Head**<br>गट शीर्ष | **(01) Fees and Fines under Maharashtra Right to Public Services Act-2015** | (०१) महाराष्ट्र लोक सेवा हक्क कायदा-२०१५ अन्वये दंड व शुल्क |
| | **(01) Fees and Fines** | (०१) दंड व शुल्क |
| योजनेचे संक्षिप्त नाव | **Fees and Fines under RTS-2015** | महाराष्ट्र लोक सेवा हक्क कायदा-२०१५ अन्वये दंड व शुल्क |
| योजनेचा सांकेतांक | **0070086901** | ००७००८६९०१ |

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं-५१/अर्थ-११, दि.१७.१.२०१८ व क्रमांक अनौस.१५८/अर्थ-११, दि.१७.०४.२०१८ तसेच महालेखापाल, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सं:ख. वि/चा-१/सामान्य प्रशासन विभाग / युओआर-१२६/२०१७-१८/९९४, दि. १९ मार्च,२०१८ च्या टिप्पणीन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२३१४०१०२२३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. रा. ठाकूर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. मुख्य आयुक्त, सेवा हक्क आयोग कार्यालय, मुंबई.
५. वित्त विभाग/व्यय-४/अर्थ-११, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र -२, नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.